MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## लग्न बीडमध्ये, बिंग फुटले रत्नागिरीत

रत्नागिरी : बीड येथे अल्पवयीन मुलीशी लग्न करुन रत्नागिरीत आलेल्या जोडप्याचे बिंग अखेरीस फुटले. तरुणीने घरगुती वादातून झोपेच्या गोळ्या घेतल्या आणि तिला जिल्हा शासकीय रुणालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर तपास केला असता सारा प्रकार समोर आला. याप्रकरणी शहर पोलिस स्थानकातून झिरो नंबरने बीड येथील पोलिस स्थानकात जोडप्याच्या पालकांविरोधात 'पोक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.काही दिवसांपूर्वी १८ वर्षे पूर्ण होऊन ५ दिवस झालेल्या विवाहित तरुणीने झोपेच्या गोळ्या घेतल्या. त्यानंतर तिला अस्वस्थ वाटू लागल्याने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील पोलिस चौकीत कर्तव्य बजावत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याने त्या मुलीची आणि तिच्या पतीची चौकशी केली. त्यावेळी तो तरुण २७ वर्षांचा आणि ती तरुणी ५ दिवसांपूर्वीच १८ वर्षे पूर्ण झालेली असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०१ अंक –२३३ बुधवार दि.१५ मे २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रु । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -233 WEDNESDAY DT. 15 MAY 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# पोलिसांच्या आर्थिक तडजोडीत ॲट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपी मोकाटच?

## बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या स्टेशनमध्ये अट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल



पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर हे एक चांगले बीड जिल्ह्याला लागलेले अधिकारी आहेत श्री नंदकुमार ठाकूर साहेब यांच्याकडून अनेक मागासवर्गीय व अन्य अन्याय अत्याचार ग्रस्त कुटुंबा व विविध व्यक्ती यांना न्याय देण्यासाठी ते एक चांगले अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे नंदकुमार ठाकूर साहेब यांनी अनेक प्रकरणांमध्ये अनेक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांचे कान उघडून संबंधित पीडित कुटुंबावर पीडित व्यक्तीला न्याय देण्यासाठी २४ तास रस्त्यावर असणारे अधिकारी म्हणून श्री नंदकुमार ठाकूर यांची ओळख आहे श्री नंदकुमार ठाकूर साहेब यांच्या कार्यकाळामध्ये बीड जिल्ह्यामध्ये शांततेचे वातावरण असतानाच मात्र यावेळी मागासवर्गीय दलित समाजांवर अन्याय अत्याचार झाल्याच्या नंतर पोलीस अधिकारी हे संबंधित पोलीस स्टेशन अंतर्गत त्या व्यक्तीला त्रास देण्याचे काम करतात म्हणून काही त्रास देणारे अधिकाऱ्यांमुळे सर्व पोलीस प्रशासनाला बदनामीला सामोरे जावे लागत आहे परंतु श्री नंदकुमार ठाकूर साहेब यांनी नक्कीच सर्व जाती धर्मातील जनतेला बीड जिल्ह्यामध्ये संरक्षण व न्याय देण्यासाठी सदैव हजर असतात म्हणून त्यांचंही बीड जिल्ह्यातील अनेक जाती धर्मातील लोक आज सुद्धा श्री नंदकुमार ठाकूर यांचे कौतुक करत आहेत

बीड /प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील एकूण ११ तालुके आहेत तर या सर्व तालुक्यातील एकूण सर्व पोलीस स्टेशनमध्ये अनेक ट्रॉसिटी चे प्रकरणात दाखल असताना यामध्ये मात्र एकही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. त्या ठिकाणी पोलीस अधिकारी पोलीस स्टेशन अंतर्गत ट्रॉसिटी चे किती गुन्हे आहेत व त्यांची संख्या पोलीस अधीक्षक यांनी जाहीर करून त्यामधील आरोपींची चौकशी करत त्यांच्यावर काय कारवाई केली हे पोलीस स्टेशनचे पोलीस प्रभारी अधिकारी यांनी जाहीर करणे गरजेचे आहे.**

**वेगवेगळ्या अकरा तालुक्यातील बीड जिल्हा मधील पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा दाखल झालेले आहेत. यामध्ये संबंधित मागासवर्गीय समाजावर फिर्याद देण्यास गेलेल्या पीडित कुटुंब व व्यक्तीवर पोलीस प्रशासन राजकीय दबाव व आर्थिक तडतडीमध्ये ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्यांच्यावर सुद्धा दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यामध्ये बीड जिल्हा पोलीस हे माहीर आहेत परंतु यामध्ये दरोड्याचा गुन्हा दाखल झाल्याच्या नंतर संबंधित पीडित कुटुंबा व व्यक्तीकडून कुठल्याही प्रकारची चौकशी अति तपासामध्ये तथ्य आढळून येत नाही. पण दरोड्याचा गुन्हा हा पोलीस प्रशासन नेमकं कोणत्या कारणामुळे दाखल करत आहे याचे उत्तर बीड जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी देणे गरजेचे आहे.**

गुन्हा दाखल करण्यासाठी गेलेल्या वेगवेगळ्या दलित मागासवर्गीय समाजातील अनेक व्यक्तींना पोलीस प्रशासन पहिल्या सुरुवातीला पोलीस स्टेशनमध्ये दिवसभर बसून ठेवतात तर काही ठिकाण होऊन काही पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी हे त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करतात जर समजूत काढण्याचा प्रयत्न करत असताना जर त्यांनी ऐकलं नाही तर त्यांना पोलीस स्टेशनच्या बाहेर हाकलून देण्याचं काम या बीड जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून होत असतानाच मात्र यावेळी ॲट्रॉसिटी ॲक्ट असेल किंवा वेगवेगळ्या छोट्या छोट्या जाती धर्मातील लोकांना आज सुद्धा बीड जिल्हा पोलिसांकडून सुरक्षा मिळत नसल्याने बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस विभागामध्ये मागासवर्गीय समाजांना वेटीस धरून त्या ठिकाणी राजकीय नेतेमंडळी कार्यकर्ते यांचा वरद हस्ता लाभलेले पोलीस अधिकारी सध्याच्या बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस स्टेशनमध्ये बसलेले आहेत सत्ताधारी पक्षाची अनेक नेतेमंडळी हे ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हे दाखल होऊ नयेत म्हणून

त्या अधिकाऱ्यांवर दबाव आणून आपल्या मर्जीतील अधिकारी हे त्या संबंधित पोलीस स्टेशनला आणून ठेवलेले आहेत परंतु याचा एकूण बीड जिल्ह्यातील गेल्या एक वर्षापासून चे म्हणजेच २०२३ २४ अंतर्गत एकूण किती गुन्हे ट्रॉसिटी क्टनुसार दाखल झालेले आहेत याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे तर यावेळी आरोपी हे फिर्यादींना गुन्हा दाखल झाल्यानंतर सुद्धा त्रास देऊन मारहाण करतात की गुन्हा परत घेण्यासाठी तर त्यांनी फिर्याद वापस नाही घेतली तर त्यांच्यावरती खोटा दरोड्याचा गुन्हा दाखल करतात या बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस स्टेशनचे पितळ पुढील भागामध्ये सायंकाळ दैनिक महाराष्ट्र आरंभ मांडणार आहे

### पोलिसांकडून काय न्याय मिळाला नाही?

तपासी अधिकारी हे डीवायएसपी पदाचे पण ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्याच अन्यायग्रस्त व्यक्तीला पीडित व्यक्तीला आर्य ची भाषा बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकाऱ्यांकडे बीड आष्टी पाटोदा शिरूर गेवराई वडवणी माजलगाव धारूर अंबाजोगाई केज परळी मध्ये एकूण किती गुन्हे ट्रॉसिटी अंतर्गत दाखल झालेले आहेत याची काय परिस्थिती आहे व एकूण गुन्ह्याची संख्या किती आहे यातील आरोपींना व तपास या अधिकारी यांनी पूर्ण केलेल्या वेगवेगळ्या ॲट्रॉसिटीतील आरोपीला सहकार्य लाभले तर फिर्यादींना पोलिसांकडून काय न्याय मिळाला नाही.

**वेगवेगळ्या पोलीस स्टेशन मधील एकूण ट्रॉसिटी क्ट व दरोड्याचे गुन्हे दाखल असलेल्या फिर्यादी वर खोटे गुन्हे दाखल केलेले या सर्वांची सविस्तर माहिती पुढील एक एक पोलीस स्टेशनची ट्रॉसिटी संख्या व फिर्यादीवर पीडित कुटुंबांवर व्यक्तीवर पोलिसांकडून झालेल्या खोट्या गुन्ह्यात सविस्तर माहिती पुढील अंकांमध्ये प्रकाशित करण्यात येईल जनतेपर्यंत पोहोचवली जाईल वाचकांना वाचनासाठी पुढील अंकांमध्ये वाचा**

**पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी बीड जिल्ह्यातील एकूण ॲट्रॉसिटीक्ट अंतर्गत किती गुन्हे दाखल झालेले आहेत त्याची काय परिस्थिती चौकशी करून अहवाल जनतेसमोर मांडावा जनतेची मागणी**

**बीड जिल्ह्यातील अनेक ट्रॉसिटी प्रकरणांमध्ये आज सुद्धा आरोपी मोकाटच पोलिसांच्या अर्थपूर्ण दुर्लक्षाने आरोपींना मिळते संरक्षण ते पण पोलिसांकडूनच? बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस स्टेशन अंतर्गत ट्रॉसिटी चे गुन्हे दाखल असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचे पितळ उघडे पडणार?**

**कुटुंबांना बीड जिल्ह्यातील पोलिसांकडून संरक्षण देण्यापेक्षा पीडित व्यक्ती व कुटुंबांना अनेक ठिकाणी त्रास सहन करावा लागत आहे**

**बीड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक कार्यालय अंतर्गत येणाऱ्या पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आज वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये अनेक पदाधिकारी काम करत आहेत यामध्ये मुख्य पाहता बीड ग्रामीण पोलीस स्टेशन, बीड शहर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, नेकनूर पोलीस स्टेशन, पिंपळनेर पोलीस स्टेशन, वडवणी पोलीस स्टेशन, माजलगाव शहर पोलीस स्टेशन, माजलगाव पोलीस स्टेशन, ग्रामीण गेवराई पोलीस स्टेशन, चकलांबा पोलीस स्टेशन, तलवाडा पोलीस स्टेशन, परळी शहर पोलीस स्टेशन, परळी ग्रामीण पोलीस स्टेशन, परळी संभाजीनगर पोलीस स्टेशन, अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन, अंबाजोगाई शहर, पोलीस स्टेशन बर्दापूर पोलीस स्टेशन, युसुफ पोलीस वडगाव पोलीस स्टेशन, अमळनेर पोलीस स्टेशन,अंभोरा पोलीस स्टेशन, आष्टी पोलीस स्टेशन, पाटोदा पोलीस स्टेशन, शिरूर पोलीस स्टेशन, या अनेक पोलीस स्टेशनमध्ये ट्रॉसिटी क्ट अंतर्गत गुन्हे दाखल करण्यासाठी केलेल्या व सर्वसामान्य फिर्यादीसाठी केलेल्या गुन्हेगारांना पोषक असलेले अधिकारी यावेळी फिर्यादीला धमकवून बाहेर काढत आहेत घेण्यासाठी टाळाटाळ करत आहेत माननीय पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी लक्ष घालणं गरजेचे आहे तर यावेळी याच पोलीस स्टेशन अंतर्गत दोन नंबर वाल्याला पोहोचण्यासाठी सुद्धा काळाबाजार आर्थिक देवाण–घेवाण करणारी अनेक अधिकारी यावेळेस या पोलीस स्टेशनमध्ये संबंधित जबाबदार व्यक्ती म्हणून बसलेले आहेत परंतु हे जनतेला न्याय देण्यापेक्षा आरोपींना जास्त न्याय देतात यामुळे यांच्या बाबतीत बीड जिल्ह्यामध्ये रोष निर्माण झाला आहे**

**बीड जिल्ह्यात एकूण ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हे दाखल करणाऱ्या फिर्यादीवर किती संख्या आहे व त्याच पीडित कुटुंब व्यक्तीवर खोट्या दरोडेच्या गुन्ह्याची एकूण संख्या पोलिस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी सांगावं**

**गेवराई माजलगाव परळी अंबाजोगाई केज धारूर वडवणी बीड आष्टी पाटोदा शिरूर ११ तालुक्यातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हे दाखल पण पोलीस आरोपी सोबत?**



## खड्डा चुकविणाच्या नादात अपघात

**बीड : माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड गावाजवळून जाणाऱ्या बीड–परळी महामार्गावरील एक खड्डा चुकविण्याच्या प्रयत्नात कारचा भीषण अपघात मंगळवारी दुपारी ४ वाजेदरम्यान झाला. कार पुलाचे कठडे तोडत पुलाखाली कोसळली. यात दोन जण गंभीर तर दोघे किरकोळ जखमी झाले आहेत.**

दिंद्रुडजवळ बीड– परळी महामार्गावर रस्त्याच्या मधोमध एक खड्डा पडला असून अपघातांचे कारण बनला आहे. जवळपास १२ अपघात गेल्या दोन महिन्यात या खड्ड्यामुळे झाले आहेत. मंगळवारी पाथरी तालुक्यातील पाथरगव्हाण येथील कल्याण घाडगे, प्रल्हाद भुमरे, शिवाजी वडमारे व अन्य एक जण धारूर तालुक्यातील देव दहिफळ येथे नवस फेडण्यासाठी आले होते. दुपारी परतत असताना ४ वाजेदरम्यान महामार्गावर अचानक खड्डा समोर आला. यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून कार पुलाला धडकून खाली कोसळली.

## मुंबई होर्डिंग दुर्घटना- ढिगाऱ्यात सापडले आणखी २ मृतदेह

### आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू; आरोपीवर २३ गुन्हे, रेप आरोपाखालीही अटक झाली होती

मुंबई /प्रतिनिधी

**मुंबईतील घाटकोपरमध्ये होर्डिंग पडलेल्या ठिकाणी बुधवारी (१५ मे) सलग तिसऱ्या दिवशी बचावकार्य सुरू आहे. दरम्यान, मंगळवारी (१४ मे) रात्री आणखी दोन मृतदेह ढिगाऱ्याखाली सापडले. एनडीआरएफने सांगितले की, अद्याप दोन मृतदेह बाहेर काढता आलेले नाहीत. त्यामुळे मृतांचा आकडा १६ वर पोहोचला आहे.**

**मुंबईत सोमवारी (१३ मे) दुपारी धुळीचे वादळ आणि पाऊस झाला. यावेळी घाटकोपर येथील पेट्रोल पंपावर अवैध जाहिरात होर्डिंग पडले होते. १०० फूट उंच आणि २५० टन वजनाच्या लोखंडी होर्डिंगखाली अनेक कार, दुचाकी आणि लोक गाडले गेले. या अपघातात ७० हून अधिक जण जखमी झाले आहेत.**

**भावेश भिंडेच्या इगो मीडिया कंपनीवर मुंबईत अनेक ठिकाणी बेकायदा होर्डिंग्ज**



**लावण्याचा आरोप आहे.**भावेश भिंडेच्या इगो मीडिया कंपनीवर मुंबईत अनेक ठिकाणी बेकायदा होर्डिंग्ज लावण्याचा आरोप आहे.दुसरीकडे बेकायदेशीरपणे जाहिरात होर्डिंग्ज लावणाऱ्या इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेड या एजन्सीचे मालक भावेश भिंडेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातानंतर भावेश फरार झाला आहे.

त्याच्यावर यापूर्वी २३ गुन्हे दाखल आहेत. भावेशला या वर्षी जानेवारी महिन्यात एका बलात्कार प्रकरणातही अटक करण्यात आली होती. मात्र, नंतर जामीन मिळाला. २००९ मध्ये विधानसभा निवडणूकही लढवली होती.

भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या म्हणण्यानुसार, बेकायदेशीर होर्डिंग्ज बसवण्याबाबत अनेक तक्रारी आल्यानंतर रेल्वेने २०१७–१८ मध्ये भावेशच्या आणखी एका कंपनीला काळ्या यादीत टाकले होते.

## १००% निकालाच्या उज्वल यशाची परंपरा कायम

बीड/प्रतिनिधी

सी.बी.एस.ई दहावी बोर्डाचा निकाल दि. १३ मे २०२४ वार सोमवार रोजी दुपारी घोषित झाला आहे. यामध्ये ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, बीड चा शंभर (१००%) टक्के निकाल लागला आहे. सी.बी.एस.ई बोर्डात आपली शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवीत, आपले वर्चस्व बीडमध्येच काय पण राज्यात सी.बी.एस.ई बोर्डात कोरण्याचे काम केले आहे. दहावी बोर्ड परीक्षेत सर्वप्रथम सायली सदानंद वीर ९५% , हर्षल लक्ष्मण कोलगुडे ९४.४%, तनिष विशाल धांडे ९३.२%, चैतन्य अंकुश घोलप ८७.८%, नीदा गफार शेख ८७.६%, टक्के मार्क मिळवले आहे. ९०% च्या वरती ०३ तर ८०% टक्के च्या वरती १४, ७०% टक्के च्या वर १२, ६०% टक्के च्या वर १५ विद्यार्थी यांनी ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलच्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. संस्थेच्या संचालकांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळेच हे सर्व शक्य झालं आहे. यामध्ये प्राध्यापक विजय पवार, प्राध्यापक राम अब्दर, प्राध्यापक भोसले सर, शाळेच्या प्राचार्या रश्मी अरोरा यांच्या नियोजनामुळे, मार्गदर्शनामुळेच ही उज्वल यशाची परंपरा कायम राखन्यात यश मिळाले आहे. १०वी बोर्डातील एस.एस.सी परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व शुभेच्छा देण्यासाठी शाळेचे संचालक व शाळेच्या प्राचार्य शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले. या मिळालेल्या यशाबद्दल सर्वच स्तरातून, माध्यमातून विद्यार्थी व शाळेचे कौतुक होताना दिसत आहे.





**बीडच्या ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलची सी.बी.एस.ई दहावी बोर्डात गगन भरारी**

# महाराष्ट्रात निवडणुकीचे समागम,रणसंग्राम,सत्ताधाऱ्यांची चक्रव्यूह आणि निवडणूक आयोग - डॉ. जितीन वंजारे

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये तसेच संबंध भारतामध्ये लोकशाहीच्या उस्तव म्हणजेच निवडणुकीचे रणसंग्राम चालू आहे,यामध्ये संपूर्ण भारतामध्ये ५४३ लोकसभा सीटवर सात टप्प्यांमध्ये निवडणूक होत आहे. देशांमध्ये पहिल्या टप्प्याचे मतदान १९ एप्रिल रोजी होत आहे यामध्ये २१ राज्य सामील असून १०२ लोकसभा सीटांवरती निवडणूक होत आहे,दुसऱ्या टप्प्यांमध्ये २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून यामध्ये तेरा राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत एकूण ९० सीटांवरती ही निवडणूक पार पडणार आहे. त्याचबरोबर भारतामध्ये तिसरा टप्पा सात मे रोजी १२ राज्यांमध्ये होणार असून त्यामध्ये ९४ लोकसभा सीट साठी मतदान होणार आहे तसेच चौथा टप्पा १३ मे रोजी पार पडणार असून दहा राज्यांमध्ये ९६ जागांसाठी मतदान होणार आहे. तसेच पाचवा टप्पा हा २० मे रोजी होणार असून आठ राज्यांमध्ये ४९ सीट साठी निवडणूक होणार आहे त्याचबरोबर सहावा टप्पा २५ मे रोजी होणार असून हा टप्पा सात राज्यांमध्ये ५७ लोकसभा सीट साठी पूर्ण होईल, त्याचबरोबर अंतिम आणि सातवा टप्पा एक जून रोजी होणार असून यामध्ये आठ राज्यांमध्ये मतदान होणार आहे त्यामध्ये ५७ लोकसभा सीट साठी मतदान होईल याप्रमाणे संपूर्ण भारत देशामध्ये लोकसभेसाठी ५४३ जागांवरती मतदान होणार असून संपूर्ण मतदान सात टप्प्यांमध्ये पूर्ण होईल.

महाराष्ट्रामध्ये २०१९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये चार टप्प्यांमध्ये निवडणूक पूर्ण झाल्या होत्या, महाराष्ट्रामध्ये ४८ लोकसभेच्या जागा आहेत मागच्या वर्षी ४८ जागेसाठी चार टप्प्यांमध्ये निवडणुकी झाल्या होत्या परंतु यावर्षी तितक्याच जागेसाठी पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होत आहेत यामध्ये जास्तीचा वेळ लागत असून हा वेळ नेमका कोणत्या कारणासाठी घेण्यात येत आहे? असा प्रश्न मनामध्ये येत आहे १९ एप्रिल रोजी लोकसभेच्या पहिल्या टप्प्याच्या निवडणुका चालू झालेल्या असून त्या एक जून रोजी संपणार आहेत या कालावधीमध्ये निवडणूक आयोगाकडे ईव्हीएम मशीन आणि व्हीव्हीपॅट राहणार आहेत संरक्षणाच्या दृष्टिकोनातून किंवा सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून यामध्ये कुठे गडबड गोंधळ तर होत नाही ना याकडे पाहण्याचे महत्व असून निवडणूक जनतेने हातात घेतली असून तंत्रज्ञानामध्ये बदल करून यामध्ये गडबड गोंधळ होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही,त्यामुळे उमेदवारांनी, कार्यकर्त्यांनी आणि लोकशाहीचा सशक्त नागरिक म्हणून आपण सर्वांनी ईव्हीएम सुरक्षिततेसाठी काम करणं गरजेचं आहे प्रत्येक टप्प्यामध्ये झालेल्या निवडणुकीचा रिझल्ट लगेच परावर्तित करणे गरजेचे होतं परंतु हा सर्व टप्प्याचे निवडणुकीचे रिझल्ट हे चार जून रोजी प्रदर्शित करण्यात येणार आहेत त्यामुळे इतक्या दिवस गोडाऊनमध्ये पडलेले ईव्हीएम मशीन तेथील सुरक्षिततेसाठी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा कवच आणि इतर गोष्टी तंतोतंत पाहणे गरजेचे आहे कारण ईव्हीएम हॅक होऊ शकतो, ईव्हीएम मध्ये दुसरा डाटा भरला जाऊ शकतो किंवा ईव्हीएम मशीन बदलल्या जाऊ शकतात असेही होऊ शकतं त्यामुळे याकडे सर्व नागरिकांनी सुरक्षितता म्हणून व निवडणूक हे महत्त्वाचं कार्य म्हणून आपण सर्वांनी जबाबदारीने लक्ष देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून यामध्ये गडबड गोंधळ खपवून घेतली जाणार नाही महाराष्ट्रामध्ये मुंबईसारख्या शहरांमध्ये असणारी मोठमोठे उद्योगधंदे व मोठमोठ्या कॉर्पोरेट संस्थांचे ऑफिस गुजरात सारख्या राज्यामध्ये स्थलांतरित करण्यावरती भर



दिला जात आहे, डिजिटल इंडिया च्या माध्यमातून कोट्यावधी रुपये खर्च करून बुलेट ट्रेन चालवल्या जात आहेत हे फक्त आणि फक्त उद्योजकासाठी होणारा विकास असून सामान्य शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या मायबाप जनतेच्या हिताचे काम होत नसल्याचे दिसून येत आहे शेतकऱ्यांसाठी या कृषीप्रधान देशांमध्ये किती काम होत आहे आणि कोण किती काम करणार आहे किंवा कोणी किती काम केलेलं आहे यावरूनच येणाऱ्या काळामध्ये लोकसभेच्या निवडणुकीचे परिणाम दिसून येणार आहेत. त्यामुळे भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि या कृषी प्रधान देशांमध्ये उद्योगाचा केंद्रबिंदू फक्त आणि फक्त शेतकरीच असला पाहिजे, कुठे कुठे निर्यात बंदी करणे,बाहेरच्या देशातून भरपूर प्रमाणात गरज नसतानाही मालाची आयात करणे त्यामुळे भारतातील शेतकऱ्यांना हमीभाव न देणे, शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना न राबवता फक्त उद्योजक पोसण्याच्या दृष्टीने उद्योगधंद्या करणाऱ्या उद्योगपतींना अमाप कर्ज देऊन त्यांचे उद्योगधंदे वाढवून त्यांच्या हाताखालच्या मांजर झालेले सरकार काय कामाचे.त्यांचे उद्योग धंदे वाढवून त्यांना कर्ज देऊन कर्ज बुडवून बाहेर देशात पळवून लाऊन देशाचा विकास होणार नाही उलट भारताची तिजोरी संपेल आणि या सार्वभौम भारताचा विकास बाजूला राहून सुटा बुटा वाल्यांचाच विकास होईल. भारताचा विकास हा गोरगरीब कष्टकरी शेतकरी मायबाप बंधू भगिनींचा किती विकास झाला? दर डोही किती उत्पन्न वाढले,येथील शेतकरी कष्टकरी सुखी आहे का? यावर विकास ठरवला जाईल.

महाराष्ट्रामध्ये ४८ जागांसाठी चार टप्प्यात निवडणुका घेणे अपेक्षित होतं परंतु पाचवा टप्पा घेऊन जास्तीचा अवलंब का केला गेला? याबद्दल निवडणूक आयोग शाशंक आहे. जास्तीचे निवडणूक टप्पे वापरून महाराष्ट्र मध्ये जातीपातीचे राजकारण करून किंवा ईव्हीएम घोटाळे करून मतपरिवर्तन होत आहे की काय असा प्रश्न पडतो आहे. प्रगत देशांमध्ये ईव्हीएम ला बॅन आहे कारण टेक्नॉलॉजीनुसार ईव्हीएम हॅक होऊ शकतो हे सिद्ध झालेल आहे,त्यामुळे भारतामध्ये अनेक बुद्धीजीवी लोकांकडून ईव्हीएम बँक साठी प्रयत्न केले गेले परंतु आजपर्यंत ईव्हीएम बंद झालेले नाही, मतपत्रिकेनुसार मतदान घेणं गरजेचं आहे परंतु जोपर्यंत भारत देशांमधून ईव्हीएम हटत नाही तोपर्यंत निवडणुकीच्या निकालावर बुद्धिजीवी लोकांचा विश्वासच नाही अशा पद्धतीची परिस्थिती आज भारतामध्ये आहे विद्यमान सरकारला अनेक लोक कंटाळलेले असून पण सत्ता परिवर्तन नाव घेत नसल्यामुळे भारतीय नागरिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे भारतामध्ये धार्मिक मुद्दे चालवले जात आहेत, मंदीर गुरुद्वारा मस्जिद वाद, प्रांतवाद,धर्मवाद, जातीयवाद,भाषावाद चालू असून यामुळे सार्वभौम भारताचे तुकडे होण्याची दाट शक्यता वाटत आहे,बाहेरील आक्रमण समजून घेतले पाहिजेत.इथे घरातील भांडणे मिटणात तर बाहेरील केंव्हा मिटतील.त्यातच विद्यमान सरकार संविधान बदलाची भाषा करत आहे एकदा का संविधान बाजूला झालं की गोरगरीब ,दलीत,शोषीत,पिडीत,आदिवासी व तस्तम अल्पसंख्यांक इत्यादी लोकांवर दिवसाढवळ्या अन्याय अत्याचार होईल प्रचंड लोक मारले जातील लोकशाही मार्गाने आंदोलन करता येणार नाही व्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतलं जाईल आणि देशांमध्ये आराजगता माजेल त्यामुळे संविधान वाचवण्यासाठी लोकशाहीच्या प्रत्येक घटकांनी प्रत्येक नागरिकांनी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे स्पष्ट मत सामाजिक कार्यकर्ते तथा राजकीय अभ्यासक डॉक्टर जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी व्यक्त केले.

# प्रदीप कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**येथील सुप्रसिद्ध लेखक प्रदीप कुलकर्णी यांच्या प्रेमात पडायचे होते पण या पुस्तकाचे प्रकाशन श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या मुख्य कार्यालयात दिनांक १८ मे २०२४ रोज शनिवार या दिवशी श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे अध्यक्ष माननीय आर जी कानडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुण्या सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त उपप्राचार्य श्रीमती स्नेहल ताई पाठक, श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे मुख्य कार्यकारी अधिकारी एडवोकेट रवींद्र कानडे, तसेच आधार मल्टीस्टेट चे चेअरमन एडवोकेट सुनील सौंदरमल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सायंकाळी पाच वाजता संपन्न होत आहे . तरी या कार्यक्रमास मराठी साहित्य रसिकांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन सौ आनंदी कुलकर्णी, भगवंत हावरगावकर, सौ भाग्यश्री हावरगावकर यांनी केले आहे**

प्रदीप कुलकर्णी हे माजलगाव परिसर या मराठी वृत्तपत्राचे संस्थापक संपादक आहेत त्यांनी आतापर्यंत १० कादंबऱ्या लिहिल्या असून त्यातील एक कादंबरी १९८४ साली प्रकाशित झाली होती. त्यानंतर तब्बल चार दशकानंतर पुस्तक रूपाने प्रकाशित होणारी त्यांची ही दुसरी कादंबरी आहे. त्यांनी आतापर्यंत भरपूर कथा लिहिल्या असून अनेक कथांचे प्रकाशन विविध दिवाळी



अंकात झालेले आहे. प्रतिलिपी च्या माध्यमातून त्यांचा वाचक वर्ग पाच लाखाच्या वर पोहोचला आहे

प्रेमात पडायचे होते पण ही कादंबरी प्रतिलिपीच्या वतीने प्रकाशित करण्यात येत आहे. तरी शनिवार दिनांक १८ मे रोजी संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास मराठी रसिक वाचकांनी आवर्जून उपस्थित राहून आपल्या शुभेच्छा द्याव्यात असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड नगर राज्य महामार्गावरील 'खड्डा' बनला अपघात 'अड्डा'

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करूनही दुर्लक्ष

आष्टी ।प्रतिनिधी

बीड नगर राज्य महामार्गावरील घाटापिंपरी येथे रस्त्यावर मधोमध पडलेला खड्डा हा अपघाताचा अड्डा बनला आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रार करून देखील कसलीच दखल घेतली जात नसल्याने या खड्ड्यात पडून एखाद्याचा बळी गेला तर संबंधित विभागावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनहित लोकशाही पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे यानी केली आहे.



बीड नगर राज्य महामार्गावरील आष्टी तालुक्यातील घाटा येथे गेल्या अनेक महिन्यांपासून एक खड्डा पडला आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करून देखील तो बुजवला जात नाही.तो खड्डा बुजविण्यात यावा यासाठी जनहित लोकशाही पार्टीच्या वतीने गांधीगिरी करून बेशरमाचे झाड लावण्यात आले होते.तरी देखील याकडे संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत आहे.दररोज एका ना एका गाडीचा इथे अपघात होत आहे.दुचाकीवरून पडल्याने अनेक जण जखमी होऊन वाहनाचे नुकसान झाले आहे.एखाद्याचा बळी गेल्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार का?असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.जर या खड्ड्यात पडून एखादी दुर्दैवी घटना घडली तर संबंधित विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनहित लोकशाही पार्टी बीड जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे यांनी केली आहे.




# सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट्स च्या चारही विद्यार्थ्यांची स्पर्धे साठी निवड

माजलगाव / प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या त्रिकोणी कराटे चषक व आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धे साठी ट्रायल सिलेक्शन घेण्यात आले होते यामध्ये माजलगावच्या सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी च्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.दि. १२/०५/२०२४. रोजी छत्रपती संभाजी नगर येथे घेण्यात अलेल्या त्रिकोणी कराटे चषक व आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा साठी ट्रायल सिलेक्शन घेण्यात आले होते. यामध्ये सेल्फ डिफेंस मार्शल आर्ट अकॅडमी माजलगावच्या ४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता या स्पर्धकांमध्ये रेहान खलंदर खान, मयूर चंद्रकांत कंकाळ, समर्थ अंकुश मुजमुले, कार्तिक सुशांत हरदास. या ४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता या स्पर्धेमध्ये या चारही विद्यार्थ्यांची निवड झाल्याबद्दल सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी माजलगाव चे संस्थापक अध्यक्ष रेन्शी माजेद सर व सर्व पालक वर्षातुन सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक होत असुन या विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या त्रिकोणी कराटे चषक व आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धे साठी ट्रायल सिलेक्शन घेण्यात आले होते यामध्ये माजलगावच्या सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी च्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.दि. १२/०५/२०२४. रोजी छत्रपती संभाजी नगर येथे घेण्यात अलेल्या त्रिकोणी कराटे चषक व आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा साठी ट्रायल सिलेक्शन घेण्यात आले होते.

# मतदानाच्या दुसर्याच दिवसापासून पंकजाताई मुंडे लागल्या कामाला ; जिल्हाभरातील पदाधिकारी,कार्यकर्त्यांची घेतली भेट

परळी / प्रतिनिधी

लोकसभा निवडणूकीची मतदान प्रक्रिया काल पार पडल्यानंतर भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे आज सकाळपासून लगेचच कामाला लागल्या. आज दिवसभर त्यांनी परळीतील 'यशश्री' निवासस्थानीं त्यांना भेटण्यासाठी जिल्हाभरातून आलेल्या भाजप-महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा करत मतदान प्रक्रियेचा आढावा घेतला. तसेच निवडणूकीसाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार मानले. आपला विजय निश्चित आहे. मतदार विकासाच्या बाजूने असून तुमच्या आशिर्वादानेच विकासासाठी काम करत राहिल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, दुपारी त्यांनी मतदानाच्या दिवशी अपघातात जीव गमावलेल्या युवकाच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले.

जिल्ह्यात सर्वत्र सोमवारी मतदानाची

## अपघातात जीव गमावलेल्या थेरला येथील युवकाच्या निधनाबद्दल पंकजाताई व्यथित ; घरी जाऊन परिवाराचे केले सांत्वन



प्रक्रिया उत्स्फूर्तपणे पार पडल्यानंतर पंकजाताई मुंडे आज लगेचच पुन्हा कार्यकर्त्यांत मिसळल्या. सकाळपासून जिल्हाभरातून महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, परळी निवासस्थानी पंकजाताईंना भेटण्यासाठी आले होते. यावेळी पंकजाताईंनी प्रत्येकाकडून मतदारसंघनिहाय आढावा घेत पदाधिकार्यांशी चर्चा केली. आपण सर्वांनी खूप चांगले काम केले. मतदानादिवशी प्रचंड उन्हात त्रास घेत बुथवर थांबलात, आपण घेतले'असे सांगत सर्वांचे आभार मानले. माझा विजय निश्चित आहे. समाजातील सर्व घटकांसाठी आपण काम करत राहणार आहोत. आपली लढाई कोणत्याही जातीच्या अथवा व्यक्तीच्या विरोधात नव्हती. जिल्ह्याच्या विकासासाठी आपण योगदान देत राहू. बीड जिल्ह्यातील जनता नेहमीच विकासाच्या बाजूने राहिली आहे.जातीपातीला त्यांनी कधीच थारा दिला नाही. या निवडणूकीतही तेच दिसले.जनतेचा आशीर्वाद मला निश्चित मिळेल अशा भावना याप्रसंगी व्यक्त केल्या.

थेरला येथील युवकाच्या निधनाबद्दल पंकजाताई व्यथित ; घरी जाऊन केले परिवाराचे केले सांत्वन

मतदानासाठी येत असताना थेरला येथील युवक अंगद रामहरी नागरे याचे शिरूर घोडनदी जवळ रस्ता अपघातात दुःखद निधन झाले. ही बातमी समजल्यावर त्या व्यथित झाल्या. काल सर्वत्र मतदान सुरू असल्याने त्या जाऊ शकल्या नव्हत्या पण आज दुपारी त्यांनी थेरला येथे जाऊन नागरे परिवाराची भेट घेतली व सांत्वन केले. मतदानाच्या दिवशीच आणखी एक घटनेत येवलवाडी येथील सुनिता नागरगोजे यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला, त्यांच्याही घरी जाऊन पंकजाताईंनी परिवाराची भेट घेतली धीर दिला.

# शिव शारदा पब्लिक स्कूलचे सीबीएसई दहावीच्या परीक्षेत यश

## पहिल्याच प्रयत्नात ९९.११ टक्के निकाल!





गेवराई ।प्रतिनिधी

सीबीएसई बोर्डाचा दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. गढी येथील सीबीएसई माध्यमाची शाळा शिव शारदा पब्लिक स्कूलच्या पहिल्या बॅचचा या परीक्षेत ९९.११% निकाल लागला असून; प्रथमच सीबीएसई बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले आहे. यामध्ये वाघमारे श्रावणी हिने प्रथम ( ९३.८० टक्के ), जोगदंड ज्ञानेश्वरी याने द्वितीय ( ९३.६० टक्के ) तर अंधुरे प्रज्ञा हिने तृतीय क्रमांक ( ९३.२० टक्के ) पटकावला. तसेच शिंगाडे समृध्दी हिने ( ९२.८० टक्के ),

दाभाडगावकर मधुरा ( ९२.८० टक्के ), पवार रोहित ( ९२.६० टक्के ), बाहेती अनिकेत ( ९२.४० टक्के ), डावकर आर्यन ( ९३.४० टक्के ), मिसाळ वरद ( ९१.८० टक्के ) या विद्यार्थ्यांनी अंतिम सहा मध्ये गुण प्राप्त केले. वाघमारे श्रावणी हिने सामाजिक शास्त्र या विषयात सर्वाधिक ९९ गुण तर बाहेती सिद्धी हिने हिंदी विषयात ९८ गुण मिळवून सबंधित विषयात प्रथम स्थान मिळवले आहे.२०२३ -२०२४ या वर्षात परीक्षेला बसलेल्या ११३ विद्यार्थ्यांपैकी ११२ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक जय भवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष - मा.शिवाजीराव ( दादा ) पंडित, अध्यक्ष - मा.अमरसिंह पंडित, सचिव - मा. जयसिंग पंडित, माजी जि. प. अध्यक्ष - विजयसिंह पंडित, मा. पृथ्वीराज पंडित, मा.रणवीर ( काका ) पंडित, शाळेचे कर्तव्यदक्ष प्राचार्य - कॅप्टन दास पिल्लई आदींनी केले. शाळेने अवलंबिलेल्या विविध पद्धतीमुळे तसेच अभ्यासू शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्याचे शाळेचे कर्तव्यदक्ष प्राचार्य कॅप्टन दास पिल्लई यांनी सांगितले.



वंचित बहुजन आघाडीचे नेते ऍड. प्रकाश आंबेडकर यांनी रमाबाई नगर घाटकोपर येथे काल झालेल्या होर्डिंग दुर्घटनेला भेट दिली. यावेळी त्यांनी पीडित कुटुंबियांच्या कुटुंबांशी संवेदना व्यक्त केली. तसेच या प्रकरणी दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. भाजप- काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेने वर्षानुवर्षे बीएमसीला लुटले आहे आणि त्यात भ्रष्टाचार केला आहे.वंचित बहुजन आघाडीची मागणी आहे की, इचउ च्या प्रत्येक अधिकाऱ्यावर शक्य तितक्या कठोर कारवाई करण्यात यावी ज्याने बेकायदेशीर होर्डिंगला इतके दिवस उभे राहू दिले त्यांना गजाआड करावे.मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबाला २० लाख रुपये आणि १० लाख रुपये मदत म्हणून तातडीने जाहीर करावी.अशी मागणी ही ऍड. प्रकाश आंबेडकर यांनी केली.यावेळी वंचित चे ईशान्य मुंबई लोकसभा उमेदवार दौलत खान, युवा नेते सुजात आंबेडकर उपस्थित होते.

# ढासळत्या सामाजिक व्यवस्थेला कविता तारू शकते - शशिकांत शिंदे

शिरूर कासार ।प्रतिनिधी

एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा आयोजित मातृदिन काव्य सप्ताहानिमित्त दि.१३ मे रोजी तेरावे राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य संमेलन संपन्न झाले. या संमेलनाच्या अध्यक्षपदी अहमदनगर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक शशिकांत शिंदे तर उद्घाटक पदी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी ऐश्वर्य पाटेकर (नाशिक) यांची एकता कोअर कमिटीने निवड केली होती. यावेळी अध्यक्षपदावरून बोलतांना शशिकांत शिंदे यांनी अखिल भारतीय स्तरावरील काव्य संमेलने रसिक श्रोत्यांअभावी ओस पडत चालली असून त्याला पर्याय म्हणून एकता सारख्या संस्थानी ग्रामीण भागात घेतलेली संमेलने समर्थपणे उभी राहू लागली आहेत. तसेच, ढासळत्या सामाजिक व्यवस्थेवर जाहीर चिंता व्यक्त करतानाच या दलदलीतून बाहेर पडायचे असेल तर समाजाला सकस कविताच बाहेर काढू शकते असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, मार्गदर्शक प्रा.डॉ.भास्कर बडे, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोशाध्यक्ष शिवलिंग परळकर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, विभागीय संघटक संपादक राजा पुजारी यांची प्रमुख उपस्थिती होती. मातृदिन काव्य सप्ताहाच्या दुसर्या तथा एकताच्या १२ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य संमेलनात छाया बेले (नांदेड), नारायण खरात (जालना), अंजली गवई (बीड), शहादेव सुरासे (पैठण), प्रविण घुले (पालघर) हे निमंत्रित मान्यवर सहभागी झाले होते. एकता फाउंडेशन अहमदनगर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पत्रकार कवी बाळासाहेब कोठुळे यांनी काव्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन केले. या काव्य संमेलनात एकता फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांसह महाराष्ट्रभरातील अनेक कवी कवयित्री सहभागी झाले होते.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी ऐश्वर्य पाटेकर यांनी उद्घाटनपर मनोगतात आई हा शब्दच मुळी एक कविता असून कवितेने संवेदनशील रसिकांचे मानसिक भरण-पोषण होऊन मानवाचे दैनंदिन जीवन समृद्ध होण्यास मदतच होत असल्याचे यावेळी सांगितले. एकताच्या या उपक्रमाचे पाटेकर यांनी विशेष कौतुक करून पदाधिकाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

# बालाघाट पत्रकार संघ नेकनूरची नवीन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी शेख जिया तर उपाध्यक्षपदी गणेश चक्रे यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

सध्याच्या काळात पत्रकारितेला सकारात्मकतेची किनार असणे अत्यंत आवश्यक झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वसामान्यांच्या हितासाठी पत्रकाराने एक नवीन दृष्टी ठेवून काम करणे सध्या गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून बालाघाट पत्रकार संघ ही पत्रकारांची संघटना एक नवा विचार घेऊन पुढे येत आहे ही संघटना येणाऱ्या काळात सर्वसामान्यांचा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आणि गोरगरीब जनतेचा आवाज बुलंद व्हावा व अन्यायाविरुद्ध काम करण्याची जिद्द घेऊन समोर येत आहे पिढीतांना न्याय देण्याचा या संघटनेचा प्रयत्न राहील. आमची ही संघटना जनतेचा हक्क व्यतिरिक्त पत्रकारान बंधूसाठी त्यांचे आरोग्य,घर,कुटुंब सुरक्षितता आणि संरक्षण ही पंचसूत्री घेऊन ही संघटना पुढे काम करणार आहे. संघटना पत्रकारांच्या पुढच्या पिढीला दिशा देण्याचे काम करेल नेकनूर येथील स्थानिक पत्रकारांची नुकतीच एक बैठक दि.१४ मे २०२४ रोजी पार पडली बैठकीत पत्रकार संघ अध्यक्षपदी शेख जिया यांची एक मतांनी निवड करण्यात आली सदर बैठकीत कार्यकारिणीची निवड होऊन उपाध्यक्षपदी गणेश चक्रे यांची तर सचिव म्हणून शेख शाकेर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित अभिजीत पवार, सय्यद अर्शद, सय्यद जुल्फेखार, सय्यद तय्यब, शेख तफिल, सय्यद दाऊद, सय्यद राजू आदी सर्वच पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस विकास शुभेच्छा देण्यात आल्या.

# स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांना वढू बुद्रुक येथे बहुजन जनता दलाकडून अभिवादन

## आंबेडकरवादी नेत्यांनीच महाराष्ट्रात रिपाइं चळवळ स्वार्थासाठी संपवली. पंडितभाऊ दाभाडे

पुणे ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सह देशात चालू असलेल्या फोडाफोडीचे राजकारण भ्रष्टाचार महागाई आणि महिलावर होणारे अन्याय अत्याचार शेतकरी शेतमजूर आत्महत्या शेतीचे नुकसान आणि देशातील वाढत चाललेला धर्मवाद आणि जातीयवाद ही बाब राजकारणासह सामाजिक न्याय व संविधान आणि लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे असे मत बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडित भाऊ दाभाडे यांनी व्यक्त केले

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर रिपाई चळवळ राज्यत आणि देशात कार्यरत होती रिपाई चळवळ मुळे अनेक नेते मंत्री .खासदार .आमदार राजपाल .विरोधी पक्षनेते नगरसेवक जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य तर सरपंच स्वराज्य संस्थेमध्ये प्रतिनिधी म्हणून निवडून आले होते आणि आजही काम करीत आहे गेल्या काही वर्षापासून रिपाई नेते रामदास आठवले जोगेंद्र कवाडे. आणि रिपाई च्या विविध गटाचे नेते स्वतःला आम्हीच खरे आंबेडकरवादी रिपाई नेते म्हणून शिवसेना काँग्रेस भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाच्या विरोधात काम करीत होते रिपाई नेते रामदास आठवले यांनी भाजपाला साथ देऊन मंत्री पद मिळवले तर प्रा. जागेंद्र कवाडे महायुतीच्या सरकारमध्ये शिंदे गटाकडून काहीतरी पदरात पडेल या आशेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे च्या शिवसेनेसोबत घरोबा केला असून नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये रिपाई चळवळ आणि रिपाईचा एकही उमेदवार या निवडणुकीच्या राज्याच्या कोणत्याच लोकसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवताना दिसला नाही. रिपाई नेत्यांनी आंबेडकरी चळवळीतील सक्रिय व निष्ठावंत कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यासोबत गद्दारी करून आंबेडकरवादी नेत्यांनीच महाराष्ट्रात रिपाई चळवळ स्वार्थासाठी संपवली असे बहुजन जनता दल राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांनी म्हटले आहे

हिमालय एवढे शौर्य प्राप्त असलेले महापराक्रमी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६७ व्या जयंती दिनानिमित्त पुणे अहमदनगर रोड वरील भीमा कोरेगाव येथून ७ किलोमीटर अंतरावर असलेल्या वढू बुद्रुक या ठिकाणी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक असलेल्या वढू बुद्रुक येथे मंगळवार दि.१४ मे .२०२४ रोजी रोजी बहुजन जनता दल पुणे शहर व जिल्हा शाखेच्या वतीने स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी अभिवादन सभा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तेव्हा बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलत होते



पुढे बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे म्हणाले की राज्यात बहुजन जनता दलाचे संघटन वाढविण्यासाठी बहुजन जनता दलाच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी राज्यात कामात सक्रिय होणे गरजेचे असून राज्यात बहुजन जनता दल मोठ्या ताकतीने वाढत असून लोकसभा निवडणुकीमध्ये बहुजन जनता दलाने स्वबळावर राज्यात लोकसभेच्या निवडणुकी तीन मतदार संघात उमेदवार उभे करून निवडणूक लढवली असून येत्या ४ जूनला लोकसभेचा निकाल असून या रोजी किती प्रमाणात बहुजन जनता दल व बहुजन जनता दलाच्या उमेदवारांना यश मिळते याकडे राज्यातील बहुजन जनता दलाच्या कार्यकर्ते व पदाधिकारी यांचे लक्ष लागले आहे असेही बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांनी सांगितले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज. छत्रपती शाहू महाराज.मा ज्योतिबा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्रातील दलित शोषित वंचित उपेक्षित बहुजन अल्पसंख्यांक अनुचित जाती जमाती भटके कष्टकरी शेतकरी शेतमजूर कामगार व महिला यांच्या सामाजिक न्याय शैक्षणिक व धार्मिक न्यायासाठी बहुजन जनता दल हाच एक राजकीय पर्याय महाराष्ट्रात असू शकतो म्हणून लवकरच बहुजन जनता दल शक्ती प्रदर्शन राज्यातील जनतेसमोर करणार असल्याचे बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांनी म्हटले आहे

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे राष्ट्रीय स्मारक असलेल्या वढू बुद्रुक येथील स्वराज्य रक्षक संभाजी महाराज यांच्या ३६७ जयंती दिनानिमित्त बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांनी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्ण कृती पुतळ्याला घालून स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीला नतमस्तक होऊन अभिवादन केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बहुजन जनता दलाचे पुणे शहर अध्यक्ष किशोर कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन बहुजन जनता दलाचे पुणे जिल्हा अध्यक्ष महेंद्र बरकडे यांनी केले यावेळी किशोर कदम प्रवेश उके सुरेश तायडे दीपक उमरे मिलिंद बोकील दिपक पाटील शांताराम मोरे संजय क्षीरसागर संजय गायकवाड मंगेश कर्णिक गौरव भरणे सुभाष पाटील महेश जाधव यांच्यासह बहुजन जनता दलाचे अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थितीत होते



# गंगामसला येथील सलून च्या दुकानावर हल्ला झाल्यानंतर खासदार प्रीतम मुंडे यांनी दिली भेट

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील गंगामसला येथील बसस्थानकावर असलेल्या चार सलुन दुकान चोरट्यांनी फोडल्याची घटना रविवारी रात्री घडली. याबाबत अधिक माहिती अशी की गंगामसला येथील बसस्थानकावर असलेल्या प्रदीप दत्तात्रय खटले याच्या मालकीचे मोरेश्वर या नावाचे सलुन दुकान आहे व त्यांच्या शेजारी त्याचे चुलत भाऊ गजानन खटले, गणेश खटले, दिलीप खटले, अशोक खटले याची दुकाने आहेत. दररोज प्रमाणे प्रदिप खटले सोमवारी दि १३ दुकान उघडण्यासाठी सकाळी आले असता नाभिक समाजा च्या चारही दुकानाची तोडफोड करून मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आल्याचे दिसून आले यामध्ये दुकानातील आरसा , टेबल,दरवाजा, व इतर साहित्याची मोडतोड करण्यात आली आहे. या विरोधात प्रदीप दत्तात्रेय खटले यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान आमच्या उमेदवाराला नाभिक समाज मतदान करणार नाही असे गृहीत धरून दुकानाची तोडफोड केल्याचा आरोप नाभिक संघटनेने केला असून दोषी तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी नाभिक संघटनेने केली आहे.

राजकीय द्वेषातुन प्रकार - खा. मुंडे

गंगामसला येथील घटना दुर्दैवी आहे. ही घटना माथेफिरू ने केली आहे. याची पोलीसांनी दखल घेऊन तात्काळ तपास करावा अशी मागणी खा. मुंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन केली आहे.

# एक व्हा, नेक व्हा आणि स्वाभिमानाने एक नेता, एक पक्ष, एक झेंडा हाती घ्या

## नाग समुदायाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक ४६ वी साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) समाज जीवनात कार्यरत बुद्ध फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ७ व ८ मे १९३२ ला नागपूर येथील अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. त्या विधानाची वर्तमान प्रासंगिकता आणि संदर्भ लक्षात घेऊन सुरूवातीला बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या अनुषंगाने संघर्ष केला असला तरी पुढे जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून या देशातील द्रविड व नाग लोक एकच असल्याचे स्पष्ट करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लढा दिला आहे. याची जाणीव ठेवून त्या संदेशाच्या ९२ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून नाग लोकांच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ-) आईनाच्या संयुक्त विद्यमाने ४६ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ५ मे २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन बहुजन समाज भुषण पुरस्कार प्राप्त उद्धव बनसोडे म्हणाले की, साधा विजेचा दर ठरविण्याचा अधिकार आपणांस असुन सुद्धा टाळूवरील लोणी खाणारे ठरवीत आहेत. न्यायालयातील काही न्यायधीश सुद्धा पूर्वग्रहदूषित भावनेने वागत आहेत. मूलनिवासीयांचे हक्क अधिकार नाकारले जात आहेत. आंबेडकराईट नसलेले प्रतिनिधी निवडल्याने आपली वाताहात झाली आहे. आपली माणसे मोठी झाली की समाजाला विसरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, उच्चाधिका-यांनी आपण ज्या झोपडपट्टीतून आलो, त्या झोपडपट्टीतून लाल दिव्याची गाडी फिरविली पाहिजे. जेणेकरून त्या झोपडपट्टीत राहणा-या जनतेला प्रेरणा मिळेल. आपल्या जनतेवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला आळा घालण्यासाठी सत्तेच्या चाब्या आपल्या ताब्यात असायला हव्यात. करिता सत्तेचे गणित समजून घेऊन योग्य प्रतिनिधी निवडले पाहिजेत.

या प्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, भारताचे संविधान आणि धम्म एकच आहे. करिता त्याची जोपासना करण्यासाठी धम्म पालनाने शीलवान, गुणवान मानसे निर्माण होणे आवश्यक आहे. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकसित केले पाहिजेत. सुशिक्षितांनी मागे वळून सिंहावलोकन केले पाहिजे. राजू काटोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर कोलंबिया विश्वविद्यालयात ढहश ड्रा- लेश्र`ष घपुेश्रशवसश अर्थात ज्ञानाचे प्रतिक असे लिहिले आहे. ज्यामुळे बराक ओबामा सारख्या महनीय व्यक्ती पुढे आल्यात. महादेव डांबरे म्हणाले की नाग लोकांच्या हाती सत्तेची सुत्रे आल्याशिवाय आपला विकास होणार नाही. भारतातील प्रत्येक नागरिकांच्या अंगी भारतीयता भिनली पाहिजे. काय आपण मूर्ख, नालायक आहोत? ज्यामुळे ४ टक्के शेटजी, भटजी, लाटजी आपल्यावर राज्य करतात. करिता ८५ टक्के मूलनिवासी बहुजन समाजाचे ऐक्य झाल्यावर आपली सत्ता असेल. म्हणून एक व्हा, नेक व्हा आणि एक पक्ष, एक नेता, एक झेंडा हाती घ्या. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, गिळलेला घास आणि घेतलेला श्वास हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच मिळाला आहे. याची जाणीव ठेवून लढला नाहीस तरी चालेल पण विकला जाऊ नकोस, ही भूमिका पार पाडावी लागेल. सत्ता हेच सर्वस्व नाही तर सामाजिक क्रांती नंतरच राजकीय क्रांती होऊ शकेल. याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करावे लागेल. प्रा. मंगला झिने म्हणाल्या की, उच्चभ्रू वसाहतीतील लोकांचा सुद्धा सामाजिक कार्यात सहभाग नसतो. आंबेडकराईट व्हायला कुणी तयार नाहीत? निवडणूकीत उमेदवाराचे चारित्र्य, गुणवत्ता तपासून निवड केली पाहिजे. अन्यथा नोटाचा वापर करावा. संघदीप रोडगे म्हणाले की, केवळ राजकीय सुत्रे हाती आल्याने समस्या सुटतील काय? ब्राह्मण समाजातील लोक राजकीय सुत्रे इतरांच्या हातात देऊन राज्यकारभार स्वतः बघतात. इतिहासातून धडा घेतला नाही तर इतिहास आपणास धडा शिकवेल.



सत्तेत येण्यासाठी संघटीतपणे शिस्त पाळली पाहिजे. करिता केवळ रक्तातील नव्हे! तर वैचारिक निष्ठावान लोकांची आवश्यकता आहे. नाग लोक हे तुटलेले आहेत.

प्रमुख वक्ते एड. विजय सुरडकर म्हणाले की, राष्ट्रपती आदिवासी, प्रधानमंत्री ओबीसी ही माणसे आपली असली तरी त्यांचे मेंदू मात्र आपल्या विचारांचे नाहीत. ज्यामुळे देशाच्या प्रथम नागरिक असलेल्या राष्ट्रपतींना सुद्धा उद्घाटनाला बोलावले जात नाहीत. याचे मूळ शोधून सुगरणीचा घरटा तैयार करावा लागेल. शेजारच्या माणसाबरोबर जयभीम बोलायला लाज वाटणारा समाज तैयार होत आहे, ही अधोगती कडे जाणारी वाटचाल होय. सामाजिक व राजकीय चारित्र्य असलेल्या नेतृत्वाचा स्विकार केला पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ सप्टेंबर २९४४ ला मद्रास येथे शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा होय असे म्हटले होते. त्यापूर्वी ७ व ८ मे १९३२ ला नागपूर येथील अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. असे म्हटले होते. त्या विधानाची वर्तमान प्रासंगिकता आणि सदर्भ लक्षात घेऊन सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी संघर्ष केला असला तरी पुढे जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून या देशातील द्रविड व नाग लोक एकच असल्याचे स्पष्ट करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लढा दिला आहे. याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन नाग समुदायाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. या विषयावर आज आपण वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन केले आहे. जेणेकरून समाजाची होत असलेली दुरावस्था आणि नेतृत्वात निर्माण झालेली निर्वात पोकळी याची जाणीव होऊ शकेल. समाजातील वसाहतीतील विहारात आपले योग्य प्रतिनिधी, अध्यक्ष, सचिव निवडण्यास सक्षम नसणारा समाज आपले योग्य प्रतिनिधी, आमदार, खासदार निवडून विधायिकेत कसे पाठविणार आहे? अशी भिषण परिस्थिती समाजात असल्याने हा विषय ऐरणीवर आणून चर्चा करने गत्यंतर झाले आहे. मागील महिन्यात फुले आंबेडकर जयंती देशभरात साजरी करण्यात आली. ज्यावर कुंभकर्णीय झोपेतून जागे होणाऱ्या हितचिंतकांनी भावनिकतेपोटी कोट्यवधी रुपयांचा आर्थिक चु-हाडा नाचगाणी आणि डी. जे. वर केला आहे. ज्या बळावर योग्य प्रतिनिधी निवडून आणण्यासाठी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ समजून घेण्याची प्रक्रिया मंदावली असल्याने नेतृत्वहीन समाजात नेतृत्व निर्माण करण्याचा वसा घेतल्याची वल्गना करणारे सुद्धा नेतृत्वहीन झाल्याची जाणीव होत आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे केवळ निवडणुक जिंकल्याने राजकीय पक्षाचे अस्तित्व कायम राहणार नाही तर जनतेला शिक्षित करून संघटीत होण्यासाठी संघर्ष करायला भाग पाडण्याची प्रक्रिया सातत्याने समाज जीवनात राबविली पाहिजे. करिता अनंत नाग, वासुकी नाग, तक्षक नाग, कारकोटम नाग, ऐरावत नाग या सारख्या प्रचारक आणि प्रसारकांची फौज निर्माण केली तरच नाग समुदायाच्या हाती राजकीय सुत्रे येऊ शकतील. या अनुषंगाने आपण सर्वांनी मार्गक्रमण करावे.

या कार्यशाळेच्या सुरुवातीला स्मृतीशेष पँथरनेते गंगाधर गाडे यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यशाळेला महादेव डांबरे, एड. विलास रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, राजू काटोले, धनराज गोंडाणे, एड. विजय सुरडकर, प्रा. मंगला झिने, संघदीप रोडगे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

आपले सहकारी : बी. बी. मेश्राम, संचालक फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, ४, साकेत नगर, (पेठे नगर), छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद), महाराष्ट्र. ४३१००२
संपर्क : ९४२१६७८६२८

# शिरूर येथे धर्मवीर संभाजी महाराज यांची जयंती साजरी



**महारथी कर्ण क्रीडा व्यायाम शाळेच्या वतीने आयोजन**

शिरूर – शहरात प्रथमतः जिजामाता चौकात व शहरातील छत्रपती संभाजी राजे चौकात धर्मवीर संभाजीराजे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या वेळी जिजामाता चौकात तोफांची सलामी देऊन प्रतिमेचे पूजन केले प्राचार्य सुधाकर खोले, सामाजिक कार्यकर्ते कल्याण तांबे, नगरसेवक उद्धव घोडके, मराठा सेवा संघाचे संतोष गुजर उपसरपंच राम कोकाटे, विधीज्ञ हरी कोठुळे पत्रकार संघाचे अध्यक्ष भारतकुमार पानसंबळ डॉ.पाचपुते राजेंद्र थोरात आदेश गटागट कृषीचे संजय फरताडे, किरण जाधव, भिलारे, वारे सर यांच्यासह अनेकांनी उपस्थिती दर्शवली तसेच संभाजी महाराजांच्या प्रतिमेला विधीवत दुग्धाभिषेक करण्यात आला.त्यानंतर प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.या जयंती सोहळ्याचे आयोजन आयोजन महारथी कर्ण क्रीडा व्यायाम शाळेचे संचालक माऊली पानसंबळ यांनी केले होते.या कार्यक्रमाला प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर,दता पाटील गाडेकर,माजी सभापती बबनराव चौधरी,सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ गवळी ,नगरसेवक भगवान सानप,नशिर भाई शेख,गणेश भांडेकर गणेश तळेकर,सागर उटे , रमाकांत मावसकर,बाळासाहेब गायकवाड,पांडुरंग थोरात,आनंद जावळे,सोपान मोरे,आजिनाथ काटे,शिवाजी वाघमारे,बाळासाहेब हरिदास,माजी सैनिक अशोक गिरी,गणेश मोरे,गणेश कातखडे, पत्रकार गोकुळ पवार,सतिश मुरकुटे यांची उपस्थिती होती.

# भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी चाळीस घरांच्या गुंजाळा ग्रामस्थांची ३२ लाख रुपये देणगी

**२६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन**

भगवानगड ।प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे गुंजाळा येथे सप्ताहानिमित्त आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ३२ लाख रुपये झाली.



नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# लिंबागणेश येथे झोटींगबाबा यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न

लिंबागणेश: बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश येथे आज दि.१२ रविवार रोजी झोटींग बाबा यांची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यंदा यात्रेचे १० वे वर्षं असुन माळरानावर जांभळीच्या झाडाखाली असलेल्या झोटींगबाबा यांचे शेतकऱ्यांना पशुधनाबद्दल विशेष महत्त्व असुन पोळ्याच्या दिवशी पंचक्रोशीतील पशुपालन याठिकाणी नारळ फोडुन नैवेद्य दाखवण्यासाठी आवर्जून येतात.ढवळे नाईगडे,घोलप,वाणी,जाधव, थोरात यांची देवस्थान ठिकाणी शेती असणा-या प्रमुखांसह ईतर भाविकांनी गेल्या वर्षी ४ लाख रुपये लोकवर्गणीतून मंदिर बांधले.आज यात्रेनिमित्त आराध्यांच्या गोंधळ कार्यक्रमासह महाप्रसादाची पंगत घालण्यात आली शाकाहारी आणि

मांसाहारी दोन्ही प्रकारचे नैवेद्य दाखविण्यात आले.भाविकांनी घरून आणलेल्या भाकरी व त्याठिकाणी केलेल्या भाजीचा महाप्रसादाचे भाविकांनी सेवन केले.



# इयत्ता दहाविच्या सीबीएसई परिक्षेत ८४% गुण घेवून जास्मीन मुलानीचे यश

तुळजापूर ।प्रतिनिधी

तुळजापूर येथील जास्मीन मुलानी या विर्धीनीने १० वी च्या सीबीएसई पर्टन च्या परिक्षेत ८४% गुण घेवून यश संपादन केले आहे व या मुलीने यशाचे श्रेय त्याचा आई रेश्मा मुलानी यांना दिले आहे माझ्या आई ने मला वेगवेगळ्या प्रकारचे ट्युशन व घरी सुद्धा प्रॅक्टिस घेऊन मला नेहमीच शिक्षणाबाबत मार्गदर्शन दिले त्यामुळेच मी हे यश संपादन केले आहे जस्मिन ची आई तुळजापूर येथील टाटा इन्स्टिट्यूट येथे लिपीक या पदावर कार्यरत आहेत जास्मीन मुलानी यांच्या यशा बद्दल लोकशाही पत्रकार संघाचे कार्यअधक्ष



व शासकीय गुत्तेदार अय्युब खान पठाण यांनी अभिनंदन केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT